"स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादर पीएच.डी. प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण"

Citation Analysis of Ph.D. Thesis Submitted to Swami Ramanand Teerth Marathwada University under the faculty of Humanities

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा
विद्यापीठ नांदेड, आंतरविद्याशाखे अंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

दत्तराम रामजी रगडे

M. A. (His), M.Lib. & I. Sci., M. Phil., SET, NET

ग्रंथपाल

श्री. शिवाजी कॉलेज ऑफ आर्ट, कॉमर्स ॲन्ड सायन्स, कंधार

ता. कंधार जि. नांदेड

मार्गदर्शक

डॉ.घ. ना. पांचाळ

ग्रंथपाल

माधवराव पाटील महाविद्यालय, पालम

ता. पालम जि. परभणी

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्च 2018

"स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादर पीएच.डी. प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण"

(Citation Analysis of Ph.D. Thesis Submitted to Swami Ramanand Teerth Marathwada University under the faculty of Humanities)

प्रस्तावना :

Bibliometric ही संकल्पना अगदी अलीकडेच अस्तित्वात आली आहे. ज्ञान आणि माहिती साधनांच्या प्रकाशनात अमर्याद वाढ झालेली आहे. प्रकाशीत साहित्य ग्रंथालयांना संपादन करतांना आर्थिक अडचण भासते.यांचा विचार करता ग्रंथ संग्रहाच्या व्यवस्थापनाच्या कार्यात वाढ झाली.यामुळे गेल्या 50 वर्षात ग्रंथालय व माहितीशस्त्रात एक वेगळा दृष्टिकोण पुढे आला. यामुळे ग्रंथालयात येणारे ग्रंथ आणि ग्रंथेत्तर साहित्यात झालेल्या विशिष्ट विषयाचा प्रकाशन विस्तार, लेखकांच्या संदर्भ निर्मितीच्या रीती, लेखकांचे लेखनातील उत्तरदायित्व (Authership pattern), ग्रंथालयाचा उपयोग करण्याची कार्य पध्दती आणि त्यामळे त्यांच्या निर्माण होणाऱ्या माहितीविषयक गरजा या सर्वाचा संख्यात्मक अभ्यास इ.स.1948 पासून मोठया प्रमाणावर करण्यात आला. संशोधनाच्या या प्रक्रियेतून काही नवीन सिध्दांताची निर्मिती झाली. ब्रॅडफर्ड यांनी मांडलेल्या विषय विस्तार सिध्दांत च्या अनुषंगाने ग्रथांलय व माहितीशास्त्रात बिब्लियोमॅट्रिक्स (Bibliometrics) तंत्राची निर्मिती झाली.

Bibliometrics या तंत्राव्दारे ग्रंथालय व ग्रंथालयीन साहित्य यांचे मोजमाप अतिशय सोप्या पध्दतीने केले जाते. या तंत्राव्दारे अडचणींना सहजरीत्या सोडविता येते. या तंत्राचा उपयोग राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विषयाचा विस्तार मोजण्यासाठी मोठया प्रमाणात केल्या जात आहे. या पध्दतीव्दारे लिखीत संप्रेषण क्रियेत संशोधकांसमोर येणाऱ्या अडचणी दूर केल्या जाऊ शकतात. कारण संशोधकाने संशोधन करण्यासाठी संग्रहित केलेली माहिती ही वेगवेगळया स्वरूपात असते. त्यामुळे योग्य व्यवस्थापकीय निर्णय घेणे शक्य होत नाही. परंतु Bibliometrics या तंत्राव्दारे अडचणीवर पर्याय शोधला जाऊ शकतो.

Bibliometrics म्हणजे ग्रंथमिती किंवा ग्रंथाचे मापन होय. या शब्दाची उत्पत्ती लॅटीन भाषेपासून झाली. हा Biblio आणि Metric या दोन शब्दापासून बनला आहे. Biblio म्हणजे ग्रंथ (Book) आणि Metric म्हणजे मापन होय. Biblio + metrics = Bibliometrics ग्रंथमितीतर ग्रीक भाषेत ग्रंथाचे मापन होय. Bibliometrics या संज्ञेचा उपयोग सर्व प्रथम ॲलन पीचर्ड यांनी 1969 मध्ये केला. Journal of Documentation मधील आपल्या लेखात त्यावेळी रूढ असलेल्या "Statistical Bibliography" या संज्ञेच्या जागी त्यांनी हा शब्द वापरला.त्यांनी लेखात Bibliometric हे प्रकाशित ज्ञानाच्या संख्यात्मक विश्लेषणाचे तंत्र आहे. ती एक माहिती प्रणालीची शाखा आहे असे स्पष्ट केले.परंतु या संज्ञेचा उपयोग आणि प्रात्यक्षिके 19 व्या शतकाच्या शेवटच्या दशकात करण्यात आली.म्हणून इ.स.1917 मध्ये मी. जे. कोले आणि मि. एन.बी.ॲलेस यांनी 'The History of Comparative anatomy part-1 & Statistical Analysis' मध्ये सांख्यिकीचे विश्लेषण करतानाBibliometrics च्या संज्ञेचाआधार घेतला.त्यात त्यांनी 300 वर्षाच्या सर्वेक्षणावर आधारीत विविध देशांच्या या विषयाच्या क्षेत्रातील कार्याचा अभ्यास केला.

इ.स.1922 मध्ये मि. हेलम आणि इ.स.1923 मध्ये मि. ई. डब्ल्यू.हयलुम यांनी Bibliometrics च्या क्षेत्रात योगदान केल्याचे दिसून येते.मि. ई. डब्ल्यू.हयलुम यांनी 'Preiodical Literature of Biochemistry' वरील लेखांना दाखवितांना 'Statistical Bibliography ' या संज्ञेचा उपयोग केला.त्यात त्यांनी शास्त्रीय ज्ञानात होणारी वाढ, होणारा विकास आणि आधुनिकरणात होणारी वाढ यांचे मोजमाप करण्याकरीता Statistical Bibliography या संज्ञेचा वापर केला.Statistic चा साधन म्हणून वापर करण्यात येण्याऱ्या अभ्यासाला Statistical Bibliography असे संबोधण्यात आले.1926 मध्ये मि. ॲलफर लोटका यांनी Bibliometrices च्या क्षेत्रातत्यांनी 'journal of the Washington Academy of science on the frequency distribution on scientific productivty' अंतर्गत (Frequency) वारंवारिताचा अभ्यास केला.इ.स.1948 मध्ये डॉ.एस.आर. रंगनाथन यांनी Bibliometrices सारखीच सकंल्पना

(Librametrics) लिब्रामेट्रिक्स ASLIB Conference मध्ये Lerminggton sea येथे मांडली. ज्यात ग्रंथालयाचे योग्य व्यवस्थापन करण्याकरीता ग्रंथालयात चालणाऱ्या रोजच्या प्रक्रिया, समस्या सोडविण्यासाठी गणितीय व सांख्यिकीय पध्दतीचा उपयोग केला आहे.

इ.स.1917 मध्ये कोलेस आणि ॲलेस यांनी आपल्या वैज्ञानिक प्रगतीच्या अहवालात "The Title of Comparative Anatomy" यात 300वर्षाच्या सर्वेक्षणावर आधारीत माहिती दिली.यात विविध देशांचे व विविध विषयांच्या क्षेत्रात सहभाग आणि त्यावरील अभ्यास केला.त्यास Bibliometrices च्या स्वरूपात मांडले आहे. लोटका आणि झीप्स यांनी Bibliometrices विकासात उल्लेखनीय कार्य केले आहे.लोटका यांनी आपला सिध्दांत Invese square law of scientific productivity या नावाने मांडला.त्यांनी या सिध्दंतावरून लेखकांच्या सर्जनशीलतेचे प्रमाण शोधले आहे. इ. स. 1949 मध्ये झीप्स यांनी आपला सिध्दांत Law of word occurrence या नावाने मांडला. झीप्स यांनी या Law च्या आधारे शब्दांची वारंवारीता आणि त्यांची उतरत्या क्रमाने मांडणी यांचा अभ्यास केला. Bibliometrices च्या आधुनिककाळाची सुरूवात 1950 पासून झाली.युजीन गारफिल्ड यांनी इ.स.1955 मध्येउल्लेख विश्लेषन (Citation Analysis) बद्दल महत्वपूर्ण सहकार्य केले. Bibliometrices या तंत्राअंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्रासाठी उल्लेख विश्लेषन (Citation Analysis) हे प्रबळ पद्धती तंत्र दिले आहे.

उल्लेख विश्लेषन (Citation Analysis):

संशोधक संशोधन करतांना त्याच्या अगोदरच्या संशोधकांच्या संशोधनाचा आधार घेत असतो.त्या संदर्भाचे उल्लेख संशोधनात करतांना वेगवेगळया लेखातील सर्व उल्लेखाची शेवटी संदर्भसूची दिलेली असते हे सर्व उल्लेख असतात. Bibliometrices संबधीत संशोधनात या पध्दतीचा सांख्यकिय (Quantitative) मुल्यमापन आणि गुणात्मक(Qiatiative)मुल्यमापन असा उल्लेख होतो.तसेच साख्यिकिय व गुणात्मक मुल्यमापन अशा मुख्य शाखाचा विकास झाला. संख्यात्मक मुल्यमापनात अर्थातच गणिती सिध्दांत आणि संख्याशास्त्राचा वापर होतो.

Bibliometrices पध्दतीही संदर्भ उल्लेखविश्लेषन म्हणजेच Citation Analysis आणि आशय विश्लेषन अशा दोन पध्दतीव्दारा वापरली जाते. बिब्लिओमेट्रिक्स पध्दतीचा वैज्ञानिक संशोधन पर्यायाने संशोधपर साहित्याचा सांख्यिकी अभ्यासासाठी नेहमीच वापर होतो. Bibliometrices पध्दतीच्या वापरात सर्व शोध आणि संशोधनाचे निष्कर्ष हे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालीकांमध्ये प्रकाशित केले जातात.असे साहित्य संशोधक त्यांच्या लिखानात वापरलेल्या साहित्याचा संदर्भ म्हणून उल्लेख करतात.या परिस्थितीमुळेच त्यांचे सांख्यिकी मुल्यमापन करणे शक्य होते.एखाद्या लेखाचा संदर्भ उल्लेख वारंवार होणेहा त्या लेखाचा वैज्ञानिक समुहावरील प्रभाव स्पष्ट करतो. संशोधनपूर्ण लेख लिहितांना लेखक इतर लेखकांच्या साहित्याचा संदर्भ म्हणून उल्लेख करतात त्यास सायटेशन असे म्हणतात.Citation Analysis या पध्दतीच्या विश्लेषनाच्या सबंध हा कोण कोणाच्या साहित्याचा संदर्भ उल्लेख करतो त्याच्याशी आहे.

लेखक एखादा लेख लिहित असतांना आपल्या लेखात दुसऱ्याच्या लिखित साधनांचा, त्यांनी उपयोगात आणलेल्या, संदर्भ घेतलेल्या इतर माहितीचा उल्लेख करत असतो. यालाच सायटींग (Citing) किंवा रेफरन्सींग (Referencing) म्हणतात.ज्या प्रलेखाचा आपण संदर्भ म्हणून उल्लेख करतो.त्यास उल्लेखित प्रलेख असे म्हणतात.तसेच ज्या प्रलेखात उल्लेख केला जातो.त्याला उल्लेखनार प्रलेख असे म्हणतात.तांत्रिक लेखनाकरीता देण्याची ही एक जुनी परंपरा आहे.व्हाईट (1985) मिल्नीस आणि सिमेस (1989) यांनी Citation चा विकास दर्शविला आहे.ऑक्सफर्ड इंग्लीश डिक्शनरी मध्ये 88 संदर्भाचा तसेच याचा वापर बायबल या धार्मिक ग्रंथात केल्याचे आढळून येते.

ब्रिटेन आणि लायन यांच्यामते, मुळ प्रलेखात शोध घेणे आणि त्यावरून मुळ मासिके बनविणे, प्राथमिक मासिकांचे क्षेत्र अभ्यासणे, साहित्यवाढीचे प्रमाण, संदर्भाचा वापर तसेच कालबाह्य साहित्य अभ्यासणे.बैगमन (1974)यांच्या मते, उल्लेख हे दोन प्रलेखातील संबध प्रस्थापित करणे होय. हे अशाप्रकारे दर्शविते की सायटेशन हे साहित्य उपयोगाचे निर्देशक होय.

- संशोधन लेख लिहितांना लेखक इतर लेखकांच्या साहित्याचा संदर्भ म्हणून उल्लेख करतात त्यास सायटेशन म्हणतात.
- संशोधन करतांना संशोधकाने जर विद्वान लेखकांचा लेख आपल्या संशोधनात लिहिला तर त्याचा संदर्भ देण्याच्या पद्धतीस Citation असे म्हणतात. ते लेखाच्या खाली किंवा प्रकरणाच्या शेवटी दिले जातात.

उल्लेख विश्लेषण या पद्धतीचा विश्लेषनाचा संबध हा कुणाच्या साहित्याचा संदर्भ उल्लेख करतो याच्याशी आहे. साधारणत: उल्लेखांचा अभ्यास करून निष्कर्ष काढणे सोपे नाही. परंतु मागील 300 वर्षापुर्वीच्या कालखंडानुसार जे शास्त्रीय लिखान दर्शवतात त्यानूसार Derel De Spllu Price यांनी उल्लेखनाला सुरूवातीला Scholia नाव दिले.ज्याचा अर्थ विद्त्तेशी संबधीत असा होतो. उल्लेख हा नेहमीच माहितीचा स्त्रोत म्हणून ओळखले जातात. उल्लेखाचा उपयोग ग्रंथसूचीकार, इतिहासकार, ग्रंथपाल, प्रलेखन आधिकारी इत्यादी चांगल्या प्रकारे करतात.

संशोधन विषयाची निवड (Selection of Research Topic):

संशोधन विषयाची निवड ही समस्या सुत्रनाने होत असते. एखादा विषय निश्चित करून संशोधन कार्याची सुरूवात केली जाते या हेतुपोटी विषयाची वास्तविकता, सद्यस्थिती अभ्यासणे गरजेचे वाटते. माहितीचे स्रोत हे खुप मोठ्या प्रमाणात आपणास दिसून येतात. त्या मध्ये विविध विषयांची मासिके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, पीएच. डी.प्रबंध, पेटंट, प्रमाणके, गॅजेट इत्यादीचा वापर हा माहिती मिळवण्यासाठी खुप मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे प्रस्तुत विषयामध्ये या साधनाचा कितपत वापर कसा झाला आहे.कोणत्या साहित्याचा वापर हा मोठ्या प्रामणात झाला आहे. हे जाणून घेणे महत्त्वाचे वाटते. या विषयांच्या मुख्य बाबी प्रकाश झोतात आणण्यासाठी, प्रस्तुत विषयाची वस्तुस्थिती संशोधन कार्याच्या माध्यमातून प्रकट करण्यासाठी, सुक्ष्म बाबी साधने जाणुन घेण्याकरीता संशोधकाने "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादर पीएच.डी. प्रबंधांचे उल्लेख

विश्लेषण" Citation Analysis of Ph.D. Thesis Submitted to Swami Ramanand Teerth Marathwada University under the faculty of Humanities या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objective the Reseach) :

कोणतेही संशोधन कार्य करीत असतांना संशोधक काही उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून संशोधन कार्य करीत असतो.संशोधनाला योग्य दिशा मिळावी, संशोधन हे हेतुपूर्ती करणारे असावे असे अपेक्षित असते. यासाठी संशोधकाने प्रस्तुत संशोधनाची खालील उद्दिष्ट्ये निर्धारीत केलेली आहेत.

1 स्वा. रा. ती. म. विद्यापीठास मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादर केलेल्या पीएच.डी. प्रबंधांचे ग्रंथसुचीय व विषयाप्रमाणे विश्लेषण करणे.

2 उपरोक्त प्रबंधाचे व उल्लेखांचे सांख्यीकीवर ग्रंथमितीय सुत्राचे उपयोजन तपासणे.

3 संदर्भित प्रलेखांचे प्रकार (फॉर्मनुसार) शोधणे.

4 संदर्भित/उध्दृत प्रलेखांचे कालक्रमानुसार वितरण अभ्यासणे.

5 संदर्भित/उध्दृत प्रलेखांचे लेखकत्व पॅटर्न शोधण्यासाठी.

6 संदर्भित /उध्दृत मासिकांचे रॅंक /क्रमवारी जाणून घेणे.

7 संदर्भित/उध्दृत पुस्तकांचे रॅंक/क्रमवारी समजून घेणे.

8 संदर्भित/उध्दृत केलेल्या प्रलेखांची/कागदपत्रांची भाषावार वितरण शोधणे.

9 संदर्भित/उध्दृत प्रलेखाचे भौगोलिक वितरण अभ्यासणे.

10 भारतीय व परदेशातील उध्दरणांचे/उल्लेखांचे वितरण जाणणे.

11 संदर्भित/उध्दृत वेब-संशोधने रॅंक/क्रमवारी करणे.

12 संदर्भित/उध्दृत लेखकांची रॅंक/क्रमवारी करण्यासाठी.

13 प्रकाशकांचा रॅंक/क्रमवारी ओळखणे.

गृहितकृत्ये (Hypotheses):

गृहितकृत्ये ही संशोधनाचा केंद्रबिंदू मानली जातात. संशोधन करण्यापूर्वी जी संभाव्य उत्तरे गृहित धरली जातात त्यास गृहितकृत्ये संबोधले जाते.गृहितकृत्ये संशोधनाला गती देण्याचे काम करतात.म्हणून संशोधन विषयानुसार गृहितकृत्ये ही निश्चित केली जातात.त्यामुळे प्रस्तुत संशोधनाची खालील गृहितकृत्ये मांडली आहेत.

1 पुस्तके जास्तीत जास्त उध्दृत करणारे मुख्य प्रलेख आहेत.
2 संशोधनसाठी मराठी भाषा ही प्रभावी व प्रबळ आहे.
3 बहूलेखक हे एका लेखकापेक्षा अधिक प्रभावी आहेत.
4 संशोधक भारतीय प्रकाशनास जास्तीचे प्राधान्य देतात.
5 पुरूष संशोधक त्यांच्या विषय क्षेत्रात महिला संशोधकांपेक्षा प्रबळ आहेत.

संदर्भ साहित्याचा आढावा (Review of Literature):

संदर्भ साहित्याचा आढावा हा जुन्या साहित्याचा नव्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी उपयुक्त असतो.त्यामुळे संशोधकाला नव्या जगातील नवी परिस्थिती लक्षात येते.अभ्यास विषयाकडे नव्यादृष्टीने पाहता येते.संशोधनासाठी घेतलेला नवीन विषय प्रत्यक्ष-अप्रत्यरीत्या पुर्वी झालेल्या संशोधनाशी निगडीत असतो. त्यामुळे संशोधनकर्त्याने निवडलेल्या विषय क्षेत्राशी संबंधित साहित्याचे वाचन व मनन हा संशोधनातील एक महत्त्वाचा भाग असतो.

कुलकर्णी ए. पी. (2009),"Indian Journal of Pharmaceutical education and research (1996-2006) a bibliometric analysis", पी. राजेंद्र (2005), "Bibliometric analysis of fiber optics literature", सेन बी. के. (2013), "Citations generation Potentic" , Ranveer, V. B (2017) Citation Analysis of phd Theses on Mathematices and Statistics submitted to dr babasaheb ambedkar Marathwada university

Aurangabad., जाधव वदंना शेषराव (2015), Citation Analysis phd Theses on physical sciences submitted to dr babasaheb Ambedkar Marathwada university Aurangabad, डोंगरे सुदेश नचीकेत (2016), Citation Analysis of Current Science Journal.

संशोधन पद्धती (Research Method):

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी खालील संशोधन पद्धती उपयोगात आणली जाईल.

संशोधन आराखडा (Research Design) :

संशोधन विषया संबंधित कार्याची योजना आखणे म्हणजे संशोधन आराखडा होय. संशोधन आराखड्याचे प्रत्येक संशोधनसाठी विशेष महत्त्व आहे.संशोधन आराखड्या शिवाय वस्तुनिष्ठ संशोधन करणे अशक्य आहे. म्हणून संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन आराखडा निश्चित केला जातो. संशोधन आराखड्यामध्ये कार्य प्रणालीचा एक विशिष्ट समूह असतो. त्यात तथ्य संकलन व विश्लेषण समाविष्ट केले जाते.या अनुषंगाने प्रस्तुत संशोधना करीता निरीक्षण संशोधन आराखड्याचा अवलंब केला जाईल.

नमुना निवड (Sample Method):

सामाजिकशास्त्रातील एक अविभाज्य भाग म्हणून नमुना निवड पद्धतीचा उल्लेख केला जातो. विस्तृत समूहाचा लघू प्रतिनिधी म्हणजे नमुना निवड होय. अभ्यासाचे क्षेत्र व स्वरूप लक्षात घेऊन नमुना निवड तंत्राची निवड केली जाते.नमुना निवड पद्धतीमुळे वेळ, श्रम, पैसा याची बचत होत असते. वस्तुनिष्ठ पद्धतीमुळे व प्रातिनिधिक स्वरूपात नमुना एककाची निवड केली जाते.प्रस्तुत संशोधनाकरीता नमुना निवड प्रकारातील संभाव्यता नमुना निवड पद्धती अंतर्गत ग्रिड पद्धतीचा अवलंब केला जाईल. स्वा. रा. ती. म. विद्यापीठास मानव्य विद्याशाखे अंतर्गत येण्याऱ्या 5 विषयांचा समावेश आहे. ते विषय समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास,

राज्यशास्त्र, लोकप्रशासन हे आहेत.या विषयांच्या पीएच. डी.प्रबधांचा समावेश असेल. यात प्रत्येक विषयांच्या 20 पीएच. डी.प्रबंधांचा समावेश असेल.

तथ्य संकलन (Data Collection) :

संशोधनासाठी तथ्य संकलन ही अनिवार्य बाब असते. संशोधन विषयाच्या अनुषंगाने तथ्य संकलित केली जातात. तथ्य संकलनाकरीता प्रथमिक व दुय्यम स्रोतांचा येथोचीत वापर केला जातो. या अनुषंगाने संशोधना करीता प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात येईल. प्राथमिक स्रोतांमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादर केलेल्या अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन या विषयांच्या पीएच. डी. प्रबंधांचे निरीक्षण पद्धतीद्वारे तथ्य संकलित करण्यात येईल. दुय्यम स्रोतांमध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, वृत्तपत्र, इंटरनेट इत्यादींचा आधार घेतला जाईल.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा (Scope & Limitation of Research) :

संशोधनासाठी जो विषय निवडला जातो. त्या विषयाची व्याप्ती व मर्यादा निश्चित करावी लागते. संबधित संशोधन विषय हा कोणत्या क्षेत्रापुरता मर्यादित आहे. याची माहिती द्यावी लागते. या हेतूने प्रस्तुत संशोधन विषय हा स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठापुरता मर्यादीत आहे. या विद्यापीठाच्या अनेक विद्याशाखेंपैकी मानव्य (Humanities) विद्याशाखे अंतर्गत सादर केलेल्या पीएच. डी.प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण करण्यात येणार आहे. मानव्य विद्याशाखे अंतर्गत अनेक विषयांचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधनात केवळ अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन या 5 विषयांचाच पीएच. डी.प्रबंधांच्या उल्लेखसूचींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण निहाय रचना :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रकरणांची विभागणीखालील प्रमाणे केली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात विषयाची पार्श्वभूमी, विषयाची निवड, उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, महत्त्व, संशोधन पद्धती, संशोधन विषयाची उपयुक्तता, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाची रूपरेषा निश्चित केली जाईल.

प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा

संशोधन विषया संबंधित ज्या विचारवतांनी, लेखकांनी, समिक्षकांनी संदर्भग्रंथ उपलब्ध करून दिली आहेत. त्या संदर्भ ग्रंथात सबंधित लेखकांचे विचार, मतप्रवाह लक्षात घेऊन त्यांच्या विचारांचा आढावा या प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरण तिसरे : तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रस्तुत प्रकरणात मुलभूत उद्देशित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल. प्राप्त आकडेवारीनुसार सारणीद्वारे वर्गीकरण करून आलेख दर्शविले जातील. तथ्यांचे गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात येतील.

प्रकरण चौथे : सारांश, निष्कर्ष व मार्गदर्शक सूचना

या प्रकरणात संशोधन विषयाचा सारांश नमुद केला जाईल. तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचना नुसार ठळक निष्कर्ष मांडून, उद्दिष्ट्ये व गृहितकृत्ये डोळयासमोर ठेवून योग्य त्या मार्गदर्शक सुचना सांगण्यात येतील.

संदर्भ ग्रंथसूचीः

संदर्भ ग्रंथसूची :

1) थोरात लक्ष्मण, (2007), ***'ग्रंथालय माहितीशास्त्र'***,डायमंड पब्लिकेशन्स पुणे.
2) सातारकर एस. पी., (2004), ***'संशोधन ग्रंथालय'***, य. च. म. मु. वि. नाशिक.
3) कोण्णुर एम. बी. , (2000), ***' ग्रंथालय व माहितीशास्त्र कोष'***,डायमंड पब्लिकेशन्स पुणे.
4) कुभार राजेंद्र, (2004), ***' महाविद्यालयीन विद्यापीठीय ग्रंथालय'***,य. च. म. मु. वि. नाशिक.
5) नरगुंदे रेवती, (2005), ***'प्रलेखन आणि माहितीशास्त्र'***,युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
6) भांडारकर पु. ल., (1987), ***' सामाजिक संशोधन पद्धती'***,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.
7) आगलावे प्रदिप, (2010), ***' सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे'***,साईनाथ प्रकाशन, नागपूर.
8) सोमन मा. रा., (1984), ***'सामाजिक संशोधनची तंत्रे'***,विद्यार्थीगृहे प्रकाशन, पुणे.
9) निकोसे सत्यप्रकाश, (2007), ***' ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती'***, प्रज्ञा प्रकाशन, नागपूर.
10) Ahuja Ram, (2002), ***'Research method'***, Rawat publication, Jaipur.
11) Allen Kent, (1984), ***'Encyclopedia of Library and Information Science'***, Harpear Press, New York.
12) Aksnes, D.W. (2006), ***'Citation rates and perceptions of scientific contribution'***, Journal of theAmerican Society for Information Science and Technology.

13) Bellis, De Nicola (2009),*'Bibliometrics and citation analysis: from the Science citation index to Cybermetrics'*, Scarecrow Press.

14) Gooden, A.M. (2001), *'Citation analysis of chemistry doctoral dissertations: An Ohio State University case study'.*

15) Kothari C. R., (2002), *'Research methodology'*, Visava Publication, New Delhi.

16) Kumar P. S. G., (2004), *'Research methods & Statistical techniques'*, B. R. Publishing, Delhi.

17) Lal, A., & Panda, S (1996),*'Research in plant pathology: A bibliometric analysis',* LibraryScience with a Slant to Documentation and Information Studies.

18) Lasswell Harold (1951), *'the analysis of political behavior: An empirical approach', Rautledge,* London.

19) Martin, M U (1968), *'Science citation index: A new concept in indexing'*, Library Trends, Vol.16.

20) Narin, Francis and et. Al. (1976), *'evaluative bibliometrics: the use of publication and citation analysis in the evaluation of scientific activity',* Cherry Hill, New Jercy.

21) Pritchard A (1969), *'Statistical bibliography an interim bibliography',* New WesternPolytechnic school of Librarianship, London.

22) Sen B. K., (1994), ***'Research methodology method tool and technique'***, SarswatiPublication, Jaipur.

23) http://en.wikipeda.org.

24) www.srtmun.ac.in

25) www.inflibnet.ac.in

26) www.bamu.ac.in

27) www.ycmou.ac.in

28) www.unipune.ac.in

संशोधक

दत्तराम रामजी रगडे
M. A. (His), M.lib. & I. Sci., M. Phil., SET, NET
ग्रंथपाल
श्री. शिवाजी कॉलेज ऑफ आर्ट, कॉमर्स ॲन्ड
सायन्स, कंधार ता. कंधार जि. नांदेड

मार्गदर्शक

डॉ. घ. ना. पांचाळ
ग्रंथपाल
माधवराव पाटील महाविद्यालय, पालम
ता. पालम जि. परभणी